\ \

# दि अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, अमरावती.

**जा.क्र.६४/कर्जविभाग/विमा/ २१८** **दि.१९.०६.२०२४**

## * परीपत्रक *

**विषय :- प्रधानमंत्री फसल बीमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना २०२४ मध्ये मृगबहार करिता राबविणे बाबत.**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन निर्णय क्र.फवियो/२०२४/प्र.क्र./८१/१० अे.दि.१२ जुन २०२४**

प्रधानमंत्री फसल बीमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना २०२४ मध्ये मृग बहार करिता संत्रा, मोसंबी, डाळींब, लिंबु, पेरु व सिताफळ या फळपिकासाठी हवामानावर आधारित फळपिक विमा योजना राबविण्याबाबत शासनाने संदर्भिय निर्णयान्वये मंजुरी दिलेली आहे. या योजनेची वैशिष्ट्ये व अंमलबजावणी करावयाची कार्यवाही या बाबतच्या सुचना पुढीलप्रमाणे देत आहोत.

**१) योजनेची उदिष्ट्ये :-**

१) नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकुल परिस्थितीमुळे फळपिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.

२) फळपिक नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.

३) शेतकऱ्यांना नाविण्यपुर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.

४) कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे जेणेकरुन उत्पादनातील जोखीमीपासुन शेतकऱ्यांच्या संरक्षणा बरोबरच अन्नसुरक्षा, पिकाचे विविधीकरण आणि कृषी क्षेत्राचा गतीमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हे हेतु साध्य करणे.

**२) योजना कार्यान्वित करणारी यंत्रणा, समाविष्ट पिके व समाविष्ट शेतकरी**

१) सदर फळपिक विमा योजना **'युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कं.लि.'** यांना कार्यान्वित करावयाची आहे.

२) सन २०२४-२५ पासुन पुर्नरचित हवामान आधारित फळपिक विमा योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकांसाठी ऐच्छिक आहे.

३) **जास्तीत जास्त शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेता यावा यासाठी जमीन भुधारणेच्या मर्यादेत एका शेतकऱ्यास अधिसुचित फळपिकासाठी ४ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत विमा नोंदणी करण्याची मुभा आहे.**

४) **अधिसुचित फळांपैकी एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहारपैकी कोणत्याही एकाच हंगामाकरीता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. (उदा.संत्रा, मोसंबी, डाळींब)**

५) केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षणाचे कवच लागु राहणार आहे यापेक्षा कमी वयाच्या फळबागा लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल त्यासाठी अधिसुचित फळपिकांचे उत्पादनक्षम वय खालीलप्रमाणे

| अ.क्र. | अधिसुचित फळपिक | उत्पादनक्षम वय |
|---|---|---|
| १ | संत्रा | ३ |
| २ | मोसंबी | ३ |
| ३ | डाळींब | २ |
| ४ | लिंबु | ४ |
| ५ | पेरु | ३ |
| ६ | सिताफळ | ३ |

७) आपल्या बँकेच्या कार्यक्षेत्रातील अमरावती जिल्ह्यात फक्त **संत्रा, मोसंबी, डाळींब लिंबु, पेरु व सिताफळ** पिकाकरिता ही योजना राबवावयाची असुन त्याचा तपशिल सहपत्र १ नुसार

अधिसुचित फळ पिकासाठी समाविष्ट धोके व त्यासाठी विमा संरक्षण कालावधी खालीलप्रमाणे

| अ.क्र. | फळपिके | विमा हप्ता दर (टक्के) शेतकऱ्यांकरिता | समाविष्ट धोके | विमा संरक्षण कालावधी | | विमा संरक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संत्रा (मृगबहार) | १३% | कमी पाऊस<br>पावसातील खंड | १५ जुन २०२४<br>१६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४<br>१५ ऑगस्ट २०२४ | १००००० |
| २ | मोसंबी (मृगबहार) | ५% | कमी पाऊस<br>पावसातील खंड | १ जुलै २०२४<br>१ ऑगस्ट २०२४ | ३१ जुलै २०२४<br>३१ ऑगस्ट २०२४ | १००००० |
| ३ | डाळिंब (मृगबहार) | ५% | सलग पावसाचा खंड<br>जास्त पाऊस वआर्दता | १५ जुलै २०२४<br>१६ ऑक्टोबर २०२४ | १५ ऑक्टोबर २०२४<br>३१ डिसेंबर २०२४ | १६०००० |
| ४ | लिंबु | ५% | कमी पाऊस<br>पावसातील खंड | १५ जुन २०२४<br>१६ जुले २०२४ | १५ जुलै २०२४<br>१५ ऑगस्ट २०२४ | ८०००० |
| ५ | पेरु | ५% | कमी पाऊस<br>पावसाचा खंड व<br>जास्त तापमान | १५ जुन २०२४<br>१५ जुले २०२४ | १४ जुलै २०२४<br>१५ ऑगस्ट २०२४ | ७०००० |
| ६ | सिताफळ | ५% | पावसाचा खंड<br>जास्त तापमान | १ ऑगस्ट २०२४<br>१ ऑक्टोबर २०२४ | ३० सप्टेंबर २०२३<br>३० नोव्हेंबर २०२३ | ७०००० |

**३) विमा हप्ता दर :-** संत्रा, मोसंबी, डाळींब, लिंबु, पेरु व सिताफळ करिता शेतकऱ्याने भरावयाचा फळपिक निहाय प्रति हेक्टरी विमा हप्ता दर विमा संरक्षित रक्कमेच्या ५% दर निर्धारित करण्यात आला आहे.

**४) विमा हप्ता अनुदान :-** हवामानावर आधारित फळपिक विमा योजनेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेला पिकनिहाय प्रति हेक्टरी विमा हप्तादर व शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष भरावयाचा विमा हप्ता यामधील फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान समजण्यात येईल.

**५) विमा संरक्षित रक्कम व विमा हप्त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | अधिसुचित पिकाचे नांव | विमा संरक्षित रक्कम | विमा हप्ता | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान | शेतकऱ्यांनी भरावयाची रक्कम (प्रति हेक्टरी ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संत्रा (मृगबहार) | १००००० | १३००० | ४००० | ४००० | ५००० |
| २ | मोसंबी (मृगबहार) | १००००० | ५००० | - | - | ५००० |
| ३ | डाळिंब (मृगबहार) | १६०००० | ८००० | - | - | ८००० |
| ४ | लिंबु | ८०००० | ४००० | - | - | ४००० |
| ५ | पेरु | ७०००० | ३५०० | - | - | ३५०० |
| ६ | सिताफळ | ७०००० | ३५०० | - | - | ३५०० |

वरील तक्त्यानुसार विमा प्रस्ताव स्विकारतांना शेतकरी प्रकार व फळपिक निहाय अनुदान रक्कम वजा जाता वरीलप्रमाणे शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्त्याची रक्कम भरुन घ्यावयाची आहे.

सदरची योजना कर्जदार सभासदांकरीता ऐच्छिक असल्यामुळे ज्या कर्जदार सभासदांना कर्ज खात्यामधुन फळपिक विमा काढावयाचा आहे अशा सभासदांकडुन संस्थेने विमा हप्त्याची रक्कम कर्ज खात्याला नावे टाकण्याबाबत सोबतचे नमुन्यात प्रपत्र २ प्रमाणे पुर्नरचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याबाबत घोषणापत्र व सहपत्र-४ प्रमाणे स्वंय-घोषणापत्र घेवुन फळपिक विमा योजनेअंतर्गत संस्था तथा बँकेमार्फत संत्रा, मोसंबी, डाळींब, लिंबु, पेरु व सिताफळ फळपिकाकरिता कर्ज दिले असल्यास त्या सभासदांस सदर फळ पिकाकरिता रु.३.०० लाख कर्ज मर्यादेपर्यंत (रु.३.०० लाखावरील वाढीव कर्जमर्यादा विचारात घेता येणार नाही.) विमा हप्ता रक्कमेची अतिरिक्त वाढीव फळपिक कर्जमर्यादा मंजुरीची मागणी संस्थेकडुन प्राप्त करुन घेवुन त्यास वरिष्ठ क्षेत्रिय अधिकारी यांनी मंजुरी देवुन सभासदांचे कर्ज खात्याला पिक विम्याची रक्कम नांवे टाकण्याबाबत संबंधित शाखेला डेबीट स्लीप सादर करावी व शाखेने मंजुर डेबीट स्लीपनुसार विमा हप्त्याची रक्कम संबंधित सभासदाचे कर्ज खात्याला नांवे टाकावी. तसेच ज्या कर्जदार सभासदांना कर्जखात्यामधुन फळपिक विमा काढावयाचा नाही अशा कर्जदार सभासदाकडुन सुध्दा सोबतच्या नमुन्यातील सहपत्र-५/प्रपत्र-१ कर्जदार शेतकऱ्यांनी पुर्नरचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेत सहभागी न होण्याबाबत घोषणापत्र भरुन घ्यावयाचे आहे.

शाखेने गैरकर्जदार सभासदाचा विमा हप्ता स्विकारतांना संबंधित सभासदाचे बँकेच्या शाखेत बचत खाते असल्यासच स्विकारण्यात यावा. बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी भरावयाचा फॉर्म सोबत जोडलेला असुन त्यामध्ये बिगर कर्जदार शेतकऱ्यांची परीपुर्ण माहीती भरुन **फॉर्मसोबत ७/१२, स्वयंघोषणापत्र, आधार कार्ड, पासबुकची झेरॉक्स् व Geo Tagging फोटोग्राफ्स** घेवुन पिकविमा हप्त्याची रक्कम भरुन घ्यावी व सोबतच्या फॉर्ममधील विमा हप्त्याची पोच पावती बिगर कर्जदार सभासदास द्यावी. तसेच शासन निर्णयानुसार ह्या कागदपत्रा व्यतिरिक्त Geo Tagging केलेले फोटोग्राफ्स घेणे आवश्यक आहे. Geo Tag केलेले

फोटो काढण्यासाठी NOTE CAM हा App PLAY STORE मधुन डाऊनलोड करण्यास शेतकऱ्यास सांगावे NOTE CAM या करीता **https:// Play.google.com/store/apps/ details?id=Com.derekr.Notecam** लिंक वर Click करावे सदर App (NOTE CAM) मोबाईल मध्ये डाऊनलोड झाल्यानंतर शेतकऱ्याने फळबाग असलेल्या शेतामध्ये उभे राहुन शेतकऱ्यांचा व फळबागेचा फोटो NOTE CAM कॅमेरा App ने काढावा फोटो प्रत्यक्ष त्याच क्षेत्रात उभे राहुन काढावा फोटो काढतांना मोबाईलचे लोकेशन व इंटरनेट डाटा चालु ठेवायचे सभासदाला सांगावे जर सभासदाकडुन चुकीचे फोटो किंवा प्रत्यक्ष क्षेत्र सोडुन दुसरीकडे फोटो काढले तर होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी स्वत: शेतकऱ्याची राहील हे स्पष्टपणे सांगावे तसेच काढलेला फोटो हा स्वयंघोषणापत्राच्या मागच्या बाजुने प्रिंट केलेला असणे आवश्यक आहे.

सदरची माहीती कर्जदार सभासदांचे विमा प्रस्ताव करीतासुध्दा अनिवार्य असल्यामुळे संबंधित सेवा सहकारी संस्थेचे सचिव व क्षेत्रिय अधिकारी यांनीसुध्दा प्रकरणे शाखेमध्ये पाठविण्यापुर्वी सभासदाकडुन Geo Tagging केलेले फोटोग्राफ्स घेणे अनिवार्य आहे.

**कर्जदार व गैरकर्जदार शेतकऱ्यांकडुन विमा प्रस्ताव स्विकारणे व शासनाच्या पोर्टलवर सादर करावयाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | फळपिक | अंतिम तारीख | शाखेने विमा हप्त्याची रक्कम शासनाकडे तबदिल करावयाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | बिगर कर्जदार शेतकरी/कर्जदार शेतकरी यांच्या फळपिकांचा विमा करण्याची मुदत | संत्रा मृगबहार लिंबु, पेरु | २५ जुन २०२४ | अंतिम दिनांकानंतर १५ दिवसाच्या आत |
| | | मोसंबी मृगबहार | ३० जुन २०२४ | |
| | | डाळिंब मृगबहार | १४ जुलै २०२४ | |
| | | सिताफळ | ३१ जुलै २०२४ | |

**शाखेने विमा हप्ता स्विकारलेल्या शेतकऱ्यांची माहीती शासनाच्या पोर्टलवर शेतकऱ्यांच्या विमा भरण्याच्या अंतिम तारखेनंतर १५ दिवसाच्या आत अपलोड करावी.**

तसेच हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना २०२४ बाबतची कार्यवाही यावेळीसुध्दा शाखा स्तरावरुनच करावयाची आहे जसे सभासदांची स्विकारलेली पिकविमा हप्त्याची रक्कम शासनाला चालान स्वरुपात मुदतीच्या आत तबदिल करणे व शासनाच्या पोर्टलवर शेतकऱ्यांची माहीती अपलोड करणे इत्यादी सर्व कामे शाखा स्तरावरुनच मुदतीच्या आत करावयाचे आहे.

## शासनाला रक्कम तबदिल करण्याचे विवरण खालीलप्रमाणे

१) सर्वप्रथम www.pmfby.gov.in या पोर्टलवर शाखाप्रमुखाच्या Login ID मधुनPayment Option मधील Create Declarations & Generate Challan वर Click करणे त्यामधील Season,Year, Scheme,State, पोर्टलवर येणार ते बरोबर असेल तर District,Crop,Area (Hectare) (एका पिकाचे संपूर्ण क्षेत्र टाकणे) खाली Farmer Share आपोआप येईल ते बरोबर आले की नाही हे तपासणे तसेच त्यामधील State share,GOI share ,Sum Insured आपोआपच येणार त्या नंतर Add to Declaration वर Click करणे त्यावर Declaration Summary Open होणार त्यामध्ये शाखांवरील Total Farmer

Premium व रु.५.९० पैसे (जे Expenditure PL ३००९) ला नावे देऊन Challan Amount दिसून येणार त्यानंतर Submit & generate Challan वर Click करणे तिथेच Conformation Massage येणार त्यात दोन Option Open होतील त्यामधील Yes. generate Challan वर Click करणे. Challan Generate केल्यानंतर NEFT/RTGS Payment Option दिसून येईल त्याच स्क्रिनवर शाखेकडून generate केलेले Payment Amount दिसून येईल तसेच त्यावरील Pop-Up स्क्रिनवर Online EFT Select दिसणार Make Payment वर Click केल्यानंतर Govt.Merchant UAT Challan दिसेल.त्या दिलेल्या Challan वरील Beneficiary Name , NEFT/RTGS Amount **(जी रक्कम चलान मध्ये दिसणार त्याच रक्कमेची NEFT करणे आवश्यक आहे.त्या रक्कमेला Round Off Amount न करणे.)** पोर्टलवर दिसून येणा-या चलानमधील Beneficiary A/C No., Beneficiary IFSC, Beneficiary Bank वं NEFT/RTGS शाखास्तरावरुच करणे .

**२) Challan वरील आलेल्या IFSC, A/C No. ला NEFT केल्यावर २४ तासांचे आत खालील दिलेल्या प्रमाणे कार्यवाही करावी.**

View Saved Declaration & generate Challan वर Click केल्यानंतर आलेल्या स्क्रिनवर PMFBY Ref.No.,Scheme Name , District Name,IC Name ,Farmer Premium (Rs.) Pay Govt.Charges (Rs.) ,Total Challan Amount (Rs.), Date View Details ,Action ही सर्व Option दिसून येणार आहेत.

यामधील Action मधील generate Challan वर Click केल्यानंतर वरील माहीती generate Challan List (Payment मधील तिसरे Option ) मध्ये जाते.

३) Generate Challan List या Option मध्ये IC Name ,PMFBY Ref.No., Challan No., Farmer Premium, Pay Govt.Charges (Rs.), Challan Amount (Rs.), Challan Date, Challan Status, Payment Date, Payment Status, Payment Made ,Last Checked On व Action अशी Coloum दिसून आल्यावर फक्त Action मधील View Details ला चेक करून आलेली माहीती बरोबर असल्याची खात्री करुन घेणे.त्यानंतर Check Status वर Click केल्यावर Your Request is Prosecd असा Message येणार.

४) Wallet Details वर Click करणे Branch Select करुन Load List केल्यावर पिकाची माहीती दिसून येणार त्यामधील पिकाचे नाव ,विमा हप्ता रक्कम,Remaining Amount Rs. व Action मधील दोन Option येणार. १) Statement Details Check करणे.त्यानंतर २) Transaction Details ला सुध्दा चेक करुन त्यावरील आलेल्या Transaction Ref.No., हा Beneficiary A/C No शी जुळलेला असावा. मागील वर्षी प्रमाणेच Application मध्ये Unpaid Application वर कंपनीचे नाव पिक शाखा Select करुन Find Application करणे Total Farmer Application ची यादी खाली दिसून येईल त्यामधील ज्या पिकाचे Challan Generate झाले आहे त्या पिकाचे नाव व Application Select करुन Payment वर Click केल्यानंतर स्क्रिन Open होते त्यामध्ये फक्त पिक Select करुन Pay Now वर Click करणे ह्यानंतर Unpaid Application मधील संपूर्ण सभासदांची माहीती निरंक होऊन paid Application मध्ये दिसणार.संपूर्ण पिक विमा हप्ता रक्कम दिलेल्या पध्दतीनुसार तबदील करावे व तसेच शेवटी पोर्टलवरील Payment मध्ये Wallet Details चेक करुन Remaining Amount शिल्लक नसल्याची शहानिशा करुन घेणे.

बँकेमध्ये सध्या नविन सॉफ्टवेअर कार्यान्वीत असल्यामुळे फक्त कर्जदार खातेदाराचे खाते क्रमांकात बदल झालेला असुन कर्जखाते क्रमांक एकुण ९ अंकी झालेले आहेत. ज्या कर्जदार सभासदांना विमा काढायाचा आहे अशा कर्जदार सभासदांचे कर्जखाते क्रमांक Option No 3354 मधुन संस्थानिहाय यादी काढुन त्यामधील कर्ज खातेक्रमांक नमुद करावा व संपुर्ण कर्जदार सभासदाचे विमा प्रस्ताव पोर्टलवर नव्याने भरणे आवश्यक आहे.

कर्जदार खातेदारांचे नवीन सॉफ्टवेअर मधे खाते क्रमांक शोधण्याकरीता शाखा व्यवस्थापकाचे Login मधुन Option No. 3354 → Region Code → Branch Code → GL Code (6000 Manualy टाकणे) → Socity Code → From Date (01.04.2024) → To Date (Current Date टाकणे) → Acctual → Detail → Show Report आल्यानंतर स्टेटमेंट मध्ये शेवटच्या कॉलममधील अकौन्ट नंबर घेणे. (खाते क्रमांक टाकतांना P कॅपीटल व ac स्मॉल घेऊन नंतर ६ अंकी नंबर टाकणे आवश्यक आहे.) उदा. Pac260819

बिगर कर्जदार सभासदांची माहीती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करतांना सभासदांचा बचत खाते क्रमांक १५ अंकी टाकणे अनिवार्य आहे तेव्हा शाखांनी खाते क्रमांकाबाबत दक्षता घेणे आवश्यक असुन १५ अंकी ऐवजी चुकीचा खाते क्रमांक टाकल्यास सभासदांची पिकविमा नुकसान भरपाईची रक्कम परत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे बिगर कर्जदार सभासदांची माहिती पोर्टलवर अपलोड करतांना सभासदांचा खाते क्रमांक १५ अंकाऐवजी चुकीचा टाकल्यास व त्यामुळे सभासदांची नुकसान भरपाईची रक्कम परत गेल्यास अथवा सभासद नुकसान भरपाईपासुन वंचित राहील्यास त्यासाठी पोर्टलवर माहीती अपलोड करणारा कर्मचारी व शाखा व्यवस्थापक ह्यांना व्यक्तीश: जवाबदार धरण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे शेतकऱ्यांकडुन फळपीक विमा स्विकारण्याची **अंतिम मुदत संत्रा, लिंबु, पेरुकरीता दि.२५ जुन २०२४ व मोसंबीकरीता दि.३० जुन २०२४ व डाळींबाकरीता दि. १४ जुलै २०२४ व सिताफळकरीता ३१ जुलै २०२४ पर्यंत आहे.** त्यानंतर शाखांनी विमा रक्कम स्विकारु नये. शाखेने सभासदाकडुन विमा प्रस्ताव स्विकारतांना दर्शविलेल्या पिकाचा समावेश नमुद केलेल्या सर्कलमध्ये असल्याबाबतची खात्री शाखेने करावी. संबंधित शाखा व्यवस्थापकाने परिपत्रकातील सुचनेनुसार सभासदाची पिकविमा हप्त्याची रक्कम मुदतीच्या आंत शासनाकडे तबदिल न केल्यास तसेच सभासदांची माहिती शासनाच्या पोर्टलवर मुदतीच्या आत अपलोड न केल्यास व त्यामुळे सभासद संभाव्य नुकसान भरपाई पासुन वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाखा व्यवस्थापकाची राहील ह्याची नोंद घ्यावी.

**टाचण :- तालुका/सर्कलवार व पिकनिहाय यादी.**

RBug

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**प्रतिलिपी व आवश्यक कार्यवाही करिता :-**

१) वरिष्ठ क्षेत्रिय अधिकारी (सर्व) तालुका :- ----------------
२) शाखा व्यवस्थापक / क्षेत्रिय अधिकारी (सर्व) शाखा :- ------------------
३) शाखा सचिव (सर्व) अमरावती जिल्हा देखरेख सह.संस्था म.तालुका ------------
४) मुख्याधिकारी (सर्व) ---कं.ग.ाक.---विभाग मुख्य कार्यालय, अमरावती.

**प्रतिलिपी माहीतीस्तव सविनय सादर :-**

१) मा.विभागिय सहनिबंधक,विभागिय कार्यालय,सहकारी संस्था,अमरावती
२) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारं संस्था,अमरावती
३) मा.सहाय्यक उपनिबंधक,सहकारी संस्था, तालुका ------------------
४) मा.मुख्य कार्यपालन अधिकारी,अमरावती जिल्हा सह.देखरेख संस्था,म.अमरावती
५) मा.सहाय्यक सरव्यवस्थापक (जिल्हा विकास) राष्ट्रीय कृषि ग्रामीण विकास बँक,व्यंकय्यापुरा कॅम्प,अमरावती
६) मा.विभागिय अधिकारी,महाराष्ट्र राज्य सह.बँक मर्या.,अमरावती
७) मा.लिड बँक मॅनेजर,सेंट्रल बँक ऑफ इंडिया,लिड बँक कार्यालय,अमरावती
८) मा.विभागिय कृषी सहसंचालक अमरावती विभाग,अमरावती
९) मा.जिल्हा कृषी अधिक्षक,कृषी अधिकारी कार्यालय,अमरावती
( या संबंधाने आपले स्तरावरुन तालुक्याचे आपले कृषी अधिकाऱ्यांना निर्देशित करावे.)
१०) **मा.व्यवस्थापक,**
युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरंस कंपनी लि.,
१०३, पहिला मजला MAIDC,आकृति स्टार,सेंट्रल रोड
अंधेरी (पुर्व) मुंबई-४०००९३
टोल फ्री क्र.१८००:२२४०३०/१८००२००४०३०
ई मेल-contactus@universalsompo.com

RBug

मुख्य कार्यकारी अधिकारी

**दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,मुख्य कार्यालय,अमरावती**
**हवामानावर आधारित फळपिक विमा हंगाम २०२४-२५**
**पिकवार व तालुकावार अधिसुचित सर्कलची यादी.**

| अ.क्र. | पिकाचे नांव | तालुका | सर्कलचे नांव |
|---|---|---|---|
| १ | संत्रा | अंजनगाव सुर्जी | अंजनगाव, भंडारज, विहिगाव, सातेगाव, कापुसतळणी, कोकर्डा |
| | | अचलपुर | अचलपुर, रासेगाव, असदपुर, परसापुर, पथ्रोट, परतवाडा |
| | | अमरावती | अमरावती, वडाळी, बडनेरा, नवसारी, डवरगाव, माहुली जहागीर, नांदगाव पेठ, रहाटगाव |
| | | चांदुर बाजार | चांदुर बाजार, ब्राम्हणवाडा थडी, बेलोरा, करजगाव, शिरजगाव कसबा, तळेगाव मोहना, आसेगाव पुर्णा |
| | | चांदुर रेल्वे | चांदुर रेल्वे, पळसखेड, घुईखेड, आमला विश्वेश्वर, सातेफळ |
| | | चिखलदरा | चिखलदरा, सेमाडोह, टेंभुर सोडा, गौरखेडा बाजार |
| | | तिवसा | तिवसा, मोझरी, वऱ्हा, कुऱ्हा, वरखेड |
| | | धामणगाव रेल्वे | धामणगाव रेल्वे, चिंचोली, भातकुली, अंजनसिंगी, मंगरुळ दस्तगीर, दत्तापुर, तळेगाव दशासर |
| | | नांदगाव खंडेश्वर | नांदगाव खंडेश्वर, दाभा, शिवणी, मंगरुळ चवाळा, पापळ, लोणी, धानोरा गुरव, माहोली चोर |
| | | भातकुली | निंभा |
| | | मोर्शी | अंबाडा, हिवरखेड, रिध्दपुर, धामणगाव नेरपिंगळाई , शिरखेड, मोर्शी |
| | | वरुड | वरुड, बेनोडा, पुसला, वाठोडा, लोणी, शेंदुरजनाघाट, राजुरा बाजार |
| २ | मोसंबी | अमरावती | बडनेरा, डवरगाव, माहुली जहांगीर, नांदगाव पेठ |
| | | तिवसा | तिवसा वरखेड, वऱ्हा, मोझरी |
| | | धामणगाव रेल्वे | धामणगाव रेल्वे, चिंचोली, अंजनसिंगी |
| | | मोर्शी | मोर्शी, शिरखेड, हिवरखेड, अंबाडा, नेरपिंगळाई , रिध्दपुर, धामणगाव |
| | | वरुड | वरुड, शेंदुरजनाघाट, लोणी, पुसला, बेनोडा, वाठोडा, राजुरा बाजार |
| ३. | डाळींब | मोर्शी | रिध्दपुर, धामणगाव |
| | | वरुड | शेुदरजनाघाट, राजुरा बाजार, बेनोडा |
| ४. | लिंबु | अंजनगाव सुर्जी | भंडारज,सातेगाव, विहीगाव |
| | | नांदगाव खंडेश्वर | धानोरा गुरव, पापळ, माहुली चोर |
| ५. | पेरु | अचलपुर | अचलपुर, परसापुर |
| ६. | सिताफळ | मोर्शी | नेरपिंगळाई, अंबाडा, रिध्दपुर |

| Name of Bank |
|---|

**"Opt In" form for Revamped PMFBY/RWBCIS**

Date: ____/____/ 20____

Bank Branch Name:______________________________ Branch code no. ____________

Applicant Details

1. Name of account holder as per updated Aadhaar:

2. Name of account holder as per bank pass book:

3. KCC Loan Account No:

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

4. Aadhar No:

5. Mobile/Telephone No:

I hereby, declare that I would like to take benefit of coverage under PMFBY/RWBCIS from Kharif/Rabi ____________season by choice. Therefore, requesting for enrolment under the scheme as per the scheme provisions.

| Signature of Account holder: |
|---|

**For office use:** The Above declaration in recorded in the bank documents for appropriate action as on date.

| Branch Manager (signature with date) | |
|---|---|

---

**Farmer Acknowledgement**

**Opt In form for Revamped PMFBY/RWBCIS**

Date: ____/____/ 20____

Bank Branch Name:______________________________ Branch code no. ____________

Applicant Details

1. Name of account holder as per updated Aadhaar:

2. Name of account holder as per bank pass book:

3. KCC Loan Account No:

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

4. Aadhar No:

5. Mobile/Telephone No:

**For office use:** The Above declaration in recorded in the bank documents for appropriate action as on date.

| Branch Manager (signature with date) | |
|---|---|

| Name of Bank |
|---|

"Opt Out" form for

Revamped PMFBY/RWBCIS

Date: ____/____/ 20____

Bank Branch Name:______________________ Branch code no. ____________

Applicant Details

1. Name of the KCC Holder:

2. KCC Loan Account No:

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

3. Mobile/Telephone No:

I am aware of the scheme provisions and benefits of PMFBY/RWBCIS. I hereby, declare that I would like to continue with KCC loan scheme, however, I am opting out of PMFBY/RWBCIS from Kharif/Rabi ____________season by choice. Therefore, requesting for non- enrolment under the scheme.

| Signature of account holder: |
|---|

*Disclaimer: In case, if the farmer wish to Partial Opt In for some of the crops under the scheme he/she needs to get himself/herself enrol under the scheme through other channels of enrolment like Common Service Centre, Agents of Insuarnce Companies, Online facility on PMFBY Portal or android based Crop Insuarnce App.*

**For office use: The above declaration is recorded in the bank documents for appropriate action as on date.**

| Branch Manager (signature) with date | |
|---|---|

---

**Farmer Acknowledgement**

**Opt Out form for Revamped PMFBY/RWBCIS**

Date: ____/____/ 20____

Bank Branch Name:______________________ Branch code no. ____________

Applicant Details

1. Name of the KCC Holder:

2. KCC Loan Account No:

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

3. Mobile/Telephone No.

*Disclaimer: In case, if the farmer wish to Partial Opt In for some of the crops under the scheme he/she needs to get himself/herself enrol under the scheme through other channels of enrolment like Common Service Centre, Agents of Insuarnce Companies, Online facility on PMFBY Portal or android based Crop Insuarnce App.*

For office use: The above declaration is recorded in the bank documents for appropriate action as on date.

| Branch Manager (signature) with date | |
|---|---|

# पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना

## कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी भरावयाचे विमा प्रस्ताव पत्र

**(अर्जदाराने भरावयाचे)**

**हंगाम :** मृगबहार / अंबिया बहार **वर्ष :**

**सोबत जोडावयाची कागदपत्रे :**

1. 7/12
2. पिक पेरणीबाबत स्वयं-घोषणापत्र
3. फळबागेचा Gio tagging केलेला फोटो

| | |
|---|---|
| बँकेचे नाव : | |
| शाखेचा पत्ता : | |
| फोन नं. : | |
| इ-मेल : | |
| | |

1. शेतकऱ्याचे नाव :

लिंग : स्त्री / पुरुष.

जात प्रवर्ग : (अनु. जाती / अनु. जमाती/ इतर)

वारसदाराचे नाव :

वय :

अर्जदाराशी असलेले नाते :

आधार क्र. :

पत्ता :

इतर ओळखपत्रे : पॅन कार्ड / पासपोर्ट / वाहन परवाना / निवडणूक ओळखपत्र / इतर

शेतकऱ्याचा बचतखाते क्र. :

मोबाईल क्र. :

**2. शेतक-याची वर्गवारी : अत्यल्प / अल्प / इतर**

**3. अधिसुचित क्षेत्राची माहिती :**

| जिल्हा | तालुका | महसुल मंडळ |
|---|---|---|
| | | |

**3. विम्यासाठी प्रस्तावित पीकाची व क्षेत्राची माहिती**

| तालुका | गाव | सर्व्हे नं | मालकी हक्क (मालक/भागधारक/ भाडेपटटीधारक) | फळपिकाचे नाव | फळपीक लागवडीचा दिनांक | लागवड क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

मी असे घोषित करतो / करते की हे प्रस्तात पत्रक/रजिस्ट्रेशन फोर्म भरण्याआधी मी प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेचे नियम/अटी व स्पष्टीकरण सविस्तर वाचून / समजून घेतले आहेत/ मला समजावून सांगितले आहेत. मी पुढे घोषित करतो/करते की वर दिलेली माहिती सत्य व खरी आहे. मी सर्व बाबी उघडपणे मांडल्या आहेत. मी /आम्ही विमा संरक्षित फळपिकाची लागवड केली आहे. पुढे मी असे घोषित करतो की,

मी वरील माहिती दिलेल्या पिकाचा विमा वर दर्शविलेल्या हंगामात इतर कुठल्याही विमा योजनेखाली या प्रस्ताव्या व्यतिरिक्त कुठल्याही इतर बँक/ सहकारी सोसायटी/ विमा एजेंट किंवा कुठल्याही माध्यमातून प्रस्तावित केला नाही. मी घोषित करतो की पिकास स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची सूचना 72 तासाच्या आत संबंधित विमा कंपनीस देईन.

मी विमा कंपनीस व त्यांच्या मार्फत [illegible]

ठिकाण .

दिनांक :

साक्षीदार (सही/ अंगठा ठसा आवश्यक असल्यास)

प्रस्तावक/शेतकऱ्याची सही वा अंगठा

| योजनेच्या अटी व नियम लागू | विमा ही आग्रहाची विषयवस्तु आहे |
|---|---|

कृपया मागे पहा .

बँकेच्या उपयोगाकरिता :

| अधिसुचित महसुल मंडळ | फळपिकाचे नाव | विम्यासाठी प्रस्तावित क्षेत्र हे.*** | विमा संरक्षीत रक्कम रु. | शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता दर (टक्के) | शेतकऱ्याने भरावयाची विमा हप्ता रक्कम रु. | विमा हप्त्याबावत तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 = (3) x अधिसुचित विमा संरक्षीत रक्कम | 5 | 6 = (4) x (5) | डिडि/चेक क्र/रोख |
| | | | | | | दिनांक |
| | | | | | | बँक नाव |
| | | | | | | खाते डेबीट केल्याचा दिनांक |
| | | | | | | |
| | | | | | | |

**विमा हप्त्यात सुट/सवलतीत बंदी :** विमा ॲक्टची कलम ४१ खालील प्रमाण बंधन कारक आहे.
1. भारत देशात जीविताचा किंवा मालमत्तेचा विमा करायच्या करिता किंवा विम्याच्या पुन्हा नुतनीकरणाकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्रलोभन म्हणून कोणाही व्यक्ति कोणाही व्यक्तीला आपल्या कमिशन मधून, विमा कंपनीने सूचना पत्रकात/तक्त्यात जाहीर केलेल्याच्या व्यतिरिक्त, पूर्ण किंवा काही रक्कम सुट/सवलत देणार किंवा देऊ करणार नाही.
2 कोणतीही व्यक्ति बंदीचे नियम तोडत असता आढळल्यास त्याच्यावर कायदेशीर दंड ठोठावण्यात येईल. हा दंड रुपये ५००/- पर्यंत असू शकेल

**प्रस्ताव पत्रक पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :**
1. एका महसूल मंडळातील सर्व फळपिकांसाठी एकच प्रस्ताव पत्रक सादर करावे.
2. सर्व प्रश्नांची उत्तरे पूर्णत: बरोबर द्यावी. जे प्रश्न लागू नसतील तिथे लागू नाही असे लिहावे. विमा प्रस्ताव पत्रकावर स्वाक्षरी [illegible]
3. विमा हा परम सद्भावाचा / विश्वासाचा करार असून विमा धारकाने सर्व [illegible]
4. असत्य कथन, चुकीची माहिती, अपूर्ण निवरण, महत्वाची माहिती लपवून ठेवणे, संपूर्ण माहिती न सांगणे [illegible] आढळल्यास ही पॉलिसी विमा कंपनी द्वारे रद्द करण्यात येईल या करिता माझी / आमची संमती आहे
5. कृपया प्रस्ताव पत्रकात कुठलीही शंका किंवा शंकेचे निरसन करावयाचे असेल तर जवळच्या संबंधित विमा कंपनीच्या कार्यालयाशी संपर्क करावा.
टीप- संबंधित विमा कंपनीला या पर्यंत विहित नमुन्यातील विमा प्रस्ताव पत्रक व विमा हप्ता प्राप्त होत नाही तो पर्यंत कंपनीने जोखीम स्वीकार केलेली नाही. अटी व नियम खालील प्रमाणे.

**नियम आणि अटी :**
1. प्रति शेतकरी सर्व अधिसूचित फळपीकांची एकूण 4 हे. पर्यंतच नोंदणी मर्यादित करण्यात आली आहे.
2. विमा प्रस्ताव पत्रकासोबत फळ बागेचा Gio Tagging केलेले छायाचित्र सादर करावयाचे आवश्यक आहे.
3. पीएमएफबीवाय- पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजने अंतर्गत विमा संरक्षण पीएमएफबीवाय च्या कृषि, सहकार व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचना व राज्य शासनाच्या शासन निर्णयानुसार नियम व अटी लागू राहतील.
4 शेतकऱ्यांनी एका हंगामात एकच विमा प्रस्ताव पत्रक सादर करावयाचे आहे.
5. शेतकऱ्यांनी सर्व माहिती सादर करणे आवश्यक . जर यासंदर्भात माहिती असत्य आढळल्यास विमा संरक्षण संपुष्टात येईल/रद्द होईल व विमा हप्ता जप्त केला जाईल. आवश्यक बाबीमध्ये विमा संरक्षित पीक, हंगाम, अधिसूचित क्षेत्र व विमा योग्य हित संबंध या बाबींचा समावेश आहे.
6. जर सदर विमा प्रस्ताव पत्रक अपूर्ण, विना स्वाक्षरीत, जमीन मालकी हककाच्या बाबतीत कागद पत्रे नसलेली वा विमा हप्ता सोबत नसल्यास सदरचे विमा प्रस्ताव पत्रक विमा कंपनी मार्फत रद्द केले जाईल.
7. पुढील पैकी जर काही निदर्शनास आले तर पीक विमा संरक्षण संपुष्टात येईल.
   a. जर शेतकऱ्याने धारण क्षेत्रापेक्षा अधिकच्या क्षेत्राचा विमा केल्यास.
   b. जर शेतकऱ्याने शेतीच्या एकाच सर्वे नंबर वर अनेक बँक/शाखा/विकास सेवा सोसायटी मधून कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी म्हणून किंवा विमा संरक्षित पीक/अधिसूचित पीक पेरणी केलेल्या पिका पेक्षा वेगळे असल्यास. वरील प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत कोणताही पूर्व ग्रह न ठेवता विमा हप्ता परत केला जाणार नाही, व या याबाबत चौकशी करून कारवाई करण्यात येईल.
8. संबंधित शेतकऱ्याने विमा घेतलेल्या पिकात बदल केला असेल, वीमित क्षेत्रात बदल केला असेल, बँक खाते वा जमीन धारण मध्ये बदल केला असेल तर एका आठवड्यात कळविणे बंधनकारक आहे; तसे न केल्यास वरील मुद्दा क्रमांक ३ लागू होईल.
9. जर विमा संरक्षित क्षेत्र प्रत्यक्ष पेरणी क्षेत्रापेक्षा जास्त असेल तर विमा संरक्षित क्षेत्राच्या प्रमाणात नुकसान भरपाई कमी करण्याचे अधिकार विमा कंपनीस असतील.
10. संबंधित शेतकऱ्याने जर अधिसूचित स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकास नुकसान झाल्यास किंवा पीक काढणी पश्चात नुकसान झाल्यास कोणत्याही परिस्थितीत ७२ तासाच्या आत कळविणे बंधनकारक आहे.
11. संबंधित शेतकरी विमा कंपनीस व त्यांच्या मार्फत नुकसानीची पाहणी करण्यास येणाऱ्या अधिकाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य करेल
12. आवश्यकता वाटल्यास जर नुकसान भरपाई असेल तर ती वाटपाच्या वेळेस ओळख पत्र आणि रहिवास पत्ता पुरावा संबंधित शेतकऱ्यास द्यावा लागेल
13. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम प्राप्त होण्यापूर्वी [illegible] आवश्यक आहे

येथुन कापा

<u>विमा हप्त्याची पोच पावती</u> (प्रधानमंत्री पीक विमा योजना)

दिनांक

श्री ---------------------------------------- [illegible]
---------------------------------------- महसूल मंडळ ----------------------------------------
[illegible]
(बँकेचे नाव ---------------------------------------- शाखा ---------------------------------------- खाते क्र. ----------------------------------------)
यांचेकडून ---------------------------------------- पिकासाठी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षित रक्कम रु. ---------------------------------------- करिता --------
हंगामाकरिता विमा हप्ता रक्कम रु ---------------------------------------- रोख / धनादेश / डि.डि. क्र ----------------------------------------
बँकेचे नाव ---------------------------------------- दिनांक ---------------------------------------- रोजी प्राप्त झाले.
(चेक जमा होण्याचे अधिन राहून) (कृपया पोहोच पावती पुढील संदर्भासाठी सांभाळून ठेवा)

बँक नाव :

पत्ता :